महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक आयुक्तालय
हज हाउस,छत्रपती संभाजी नगर
ई-मेल : minoritycommissionerate@gmail.com दु. क्र. :- २४०-२९९ २८८५

क्रमांक : निपोभ -२०२६/प्र.क्र.०२/शाखा-७ दिनांक :- ०५ नोव्हेंबर,२०२६

प्रति,

उपसचिव (का-९)
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय : अल्पसंख्याक समाजातील तरुणांकरिता पोलिस शिपाई भरतीपूर्व परिक्षा प्रशिक्षण कार्यक्रम "२०२६-२७" करिता पात्र संस्थाकडुन अर्ज मागविणेसाठी जाहिरात विभागाच्या वेबसाईट वर उपलब्ध करुन देण्याबाबत.

महोदय,

अल्पसंख्याक समाजातील तरुणांकरिता पोलिस शिपाई भरतीपुर्व परिक्षा प्रशिक्षण कार्यक्रम "२०२६-२७" करिता पात्र संस्थाकडुन अर्ज मागविणेसाठी जाहिरात वृत्तपत्रातील प्रसिध्दीस देण्यात आली आहे. सदर जाहिरातील मसुदा या पत्रासोबत जोडण्यात येत आहे.

प्रस्तुत जाहिरात विभागाच्या https://mdd.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर दि.१२.११.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात यावी आणि सदरची जाहिरात अंतिम दिनांक ३०.११.२०२६ पर्यत वेबसाईट वरुन काढु नये ही आपणास विनंती.

आपली,

(प्रतिभा स इंगळे)
आयुक्त, अल्पसंख्याक आयुक्तालय,
छत्रपती संभाजीनगर.

सोबत: वरील प्रमाणे

महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक आयुक्तालय

शाही मस्जिद रोड, किल्ले आर्क, हज हाउस, छत्रपती संभाजीनगर .

जाहीर सूचना

अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्यामार्फत वर्ष २०२६-२७ मध्ये राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शीख, पारसी, जैन आणि ज्यू या अल्पसंख्याक समाजातील इच्छुक उमेदवारांना निवासी पोलीस शिपाई भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यासाठी शासन निर्णय दि.१७ डिसेंबर,२०२१ मधील तरतूदीनुसार राज्यातील इच्छूक असलेल्या नोंदणीकृत संस्था / प्रशिक्षण संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये खालील बाबींचा अंतर्भाव राहील.

१. जिल्हानिहाय निवडलेल्या किमान २५ व कमाल ५० प्रशिक्षणार्थींना निवासी पोलीस शिपाई भरतीपूर्व परीक्षेसाठी प्रशिक्षण देणे.

२. सदर प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना अंकगणित, सामान्यज्ञान, चालू घडामोडी, बुध्दीमत्ता चाचणी, मराठी भाषा व शारिरीक क्षमता या विषयाचे प्रशिक्षण देऊन पोलीस शिपाई भरतीपूर्व परीक्षेसाठी त्यांची तयारी करुन घेणे.

३. प्रशिक्षणाचा कालावधी तीन महिन्यांचा निवासी स्वरुपाचा असणार आहे.

४. प्रशिक्षणा संदर्भातील (प्रशिक्षणार्थी आणि प्रशिक्षक यांचे) हजेरीपट, पत्रव्यवहार, अहवाल लेखे इ. परिपूर्ण ठेवणे.

प्रशिक्षण संस्थांच्या निवडीसाठीचे निकष खालील प्रमाणे राहतील.

१) प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्यामध्ये धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असावी.

२) संस्थेला किमान ५ वर्षाचा शिकवणीचा किंवा प्रशिक्षणाचा अनुभव असावा.

३) संस्थेकडे प्रशिक्षणार्थींना अंकगणित, चालू घडामोडी, बुद्धीमत्ता चाचणी व मराठी व्याकरण आणि शारिरीक क्षमता या विषयाचे प्रशिक्षण देण्यासाठी अनुभवी प्राध्यापक / प्रशिक्षक असणे (B.P.Ed पदविधारक,शारिरिक प्रशिक्षक), वर्ग खोल्या (५० प्रशिक्षणार्थींसाठी एक या प्रमाणे) उपलब्ध असणे, ग्रंथालय, वाचनालय, स्वच्छतागृहे आणि खेळाचे मैदान इ. सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील.

४) संस्थेकडे राहण्यासाठी पूरेशा खोल्या (५० प्रशिक्षणार्थींसाठी) स्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशी स्वच्छ स्वच्छतागृह, महिला उमेदवारांकरीता राहण्यासाठी स्वतंत्र खोल्या व स्वतंत्र स्वच्छतागृह, स्वत:च्या मालकीचे अथवा सार्वजनिक खेळाचे मैदान असणे आवश्यक आहे.

५) सदरचे प्रशिक्षण निवासी असल्यामुळे विद्यार्थ्यांची/उमेदवारांची विशेषत: महिला उमेदवारांच्या सुरक्षेसाठी योग्य ती खबरदारी तसेच त्या अनुषंगाने आवश्यक ती उपायोजना संस्थेने केलेली असणे आवश्यक आहे.

<u>प्रशिक्षण संस्थांना देय प्रशिक्षण शुल्क</u>

१. दि.१७ डिसेंबर,२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेस ५० प्रशिक्षणार्थींच्या प्रशिक्षणाकरीता निवास व्यवस्था, अभ्यास साहित्य, शारीरिक आणि बौध्दिक प्रशिक्षण, अल्पोहार व भोजन तसेच गणवेश साहित्य इ. करीता रु.१२,०२,५००/- एवढे अनुदान वितरीत करण्यात येईल. त्यापैकी प्रशिक्षण संस्थेने करारनामा करुन प्रशिक्षण सुरु केल्यानंतर ५०%, प्रशिक्षण सुरु होऊन दोन महिन्यानंतर २५% व प्रशिक्षणासाठी असलेले उमेदवार प्रत्यक्षात पोलीस भरतीच्या शारिरीक वा लेखी चाचणी परिक्षेस उपस्थितीत झाल्याचा पुरावा सादर केल्यानंतर २५% याप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या मार्फत संबंधित प्रशिक्षण संस्थांना अनुदान अदा करण्यात येईल.

<u>अर्ज करण्याची पध्दत</u>

१) इच्छुक प्रशिक्षण संस्थांनी आपले अर्ज शासन निर्णय दि.१७ डिसेंबर,२०२१ मधील प्रपत्र-अ प्रमाणे संस्थेच्या लेटरहेडवर टंकलिखीत करुन सीलबंद लखोट्यामध्ये बंद स्वरुपात संबंधित जिल्ह्यांचे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी, अल्पसंख्याक कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे सादर करावेत.

२) अर्जासोबत संस्थेच्या नोंदणीचा दाखला, संस्थेची नियमावली, शैक्षणिक / प्रशिक्षण विषयक कामाचा अनुभव, संस्थेकडे उपलब्ध अनुभवी प्राध्यापक / प्रशिक्षक, मागील तीन वर्षांचे लेखापरिक्षण अहवाल, निवासाची व भोजनाची सुविधा, खेळाचे मैदान संस्थेचे मालकीचे आहे किवा भाडेतत्वावर आहे, इ. बाबतच्या सविस्तर माहितीचे कागदपत्रांच्या प्रती जोडाव्यात.

३) लखोट्यावर वरच्या बाजूस ठळक अक्षरात "पोलीस शिपाई भरतीपूर्व परीक्षा निवासी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी अर्ज" असे लिहिलेले असावे.

४) इच्छुक प्रशिक्षण संस्थांनी आपले अर्ज संबंधित जिल्ह्याचे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी, अल्पसंख्याक कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे **(दि.३०.११.२०२६) सायंकाळी ६:१५ मिनिट** पर्यंत सादर करावेत.

निवड झालेल्या प्रशिक्षण संस्थांनी संस्था निवडीनंतर १५ दिवसाचे आत त्यांच्या जिल्ह्यातील जास्त खपाच्या मराठी, हिन्दी व उर्दू वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन तसेच Social Media वर व्यापक प्रसिध्दी करुन ज्या उमेदवारांनी या योजनेचा यापूर्वी लाभ घेतला आहे, असे उमेदवार वगळून इतर अल्पसंख्याक उमेदवारांचे अर्ज आपल्या पत्त्यावर मागवावेत (अर्जाचा नमुना शासन निर्णय दि.१७ डिसेंबर, २०२१ मधील प्रपत्र-क प्रमाणे). योग्य उमेदवारांची शारिरिक चाचणी व इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करणे व त्यामधून संस्थेने निवडलेल्या उमेदवारांची यादी व त्यांचे अर्ज जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी यांच्याकडे सादर करावेत. अशा प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण जिल्हा नियोजन अधिकारी यांनी विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून सुरु करणे निवड केलेल्या संस्थेवर बंधनकारक राहील. अंतिम निवड झालेल्या संस्थांना प्रशिक्षण देण्यासंदर्भात रु.१००/- च्या अन्यायिक मुद्रांक पेपरवर विहित नमुन्यामध्ये (शासन निर्णय दि.१७ डिसेंबर,२०२१ मधील परिशिष्ट-अ प्रमाणे)करारनामा करावा लागेल. निवड झालेल्या संस्थेस अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय दि.१७ डिसेंबर,२०२१ मधील सर्व अटी शर्ती व तरतूदीचे अनुपालन करणे बंधनकारक राहिल. सदर बाबतीत अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा निर्णय अंतिम व सर्वांवर बंधनकारक राहिल.

दिनांक:- / /, २०२६.
ठिकाण:- मंत्रालय, मुंबई.

आयुक्त,
अल्पसंख्याक आयुक्तालय,
छत्रपती संभाजीनगर